# मी ‘कमला चौधरी’ बोलतेय!



माझं नाव कमला... कमला चौधरी.

माझा जन्म २२ फेब्रुवारी १९०८ रोजी लखनौमध्ये एका संपन्न कुटुंबात झाला. वडील ब्रिटिश सरकारमध्ये उपजिल्हाधिकारी होते. घरात सुख होतं, शिस्त होती... पण मनात प्रश्नही होते. देश गुलाम का? आणि स्त्रिया दुय्यम का?

वयाच्या १५ व्या वर्षी माझं लग्न झालं. पण माझ्या आयुष्याची दिशा केवळ संसारापुरती मर्यादित राहिली नाही. ब्रिटिशांविरोधात देश उभा राहत होता. मीही उभी राहिले. वडील ब्रिटिशधार्जिणे होते; त्यांच्याशी मतभेद झाले. पण मी माझा मार्ग निवडला. माझ्या पतीने मात्र माझी साथ दिली – हे माझं भाग्य.

शिकायचं होतं, लिहायचं होतं. त्या काळात स्त्रियांच्या शिक्षणाला फारसं प्रोत्साहन नव्हतं. तरी मी पंजाब विद्यापीठातून हिंदी साहित्यात एम.ए. केलं. लेखन माझी ताकद बनली.

जातिभेद, वर्गभेद, प्रेम, नैतिकता – आणि विशेषतः स्त्रियांचं जीवन. विधवांची वेदना, स्त्रियांचं मानसिक आरोग्य, त्यांच्या मनातली घुसमट – हे मी कथांमधून मांडलं. ‘बेलपत्र’, ‘उन्माद’, ‘यात्रा’... या माझ्या कथा केवळ गोष्टी नव्हत्या, त्या स्त्रियांच्या अंतःकरणाचा आवाज होत्या.

महात्मा गांधींच्या विचारांनी प्रेरित होऊन मी सविनय कायदेभंगात भाग घेतला. तुरुंगवास भोगला. काँग्रेसच्या संघटनेत काम केलं. आणि १९४६ साली संयुक्त प्रांतातून – आजचा उत्तर प्रदेश – मी संविधानसभेत निवडून आले.

संविधानसभेतील चर्चांचा तो काळ मला आजही आठवतो. आपण नवा देश घडवत होतो. पण मला वाटत होतं – फक्त राजकीय स्वातंत्र्य पुरेसं नाही. घरातल्या स्त्रीला न्याय नसेल, तर स्वातंत्र्य अपूर्ण आहे.

हिंदू कोड बिल मांडलं गेलं तेव्हा मी ठामपणे त्याच्या बाजूने उभी राहिले. मी स्पष्टपणे सांगितलं –

"पहिली पत्नी असताना नवऱ्याला एक, दोन, तीन, चार लग्नांची मुभा देणं हा त्या स्त्रीवर घोर अन्याय आहे. सवत असण्याइतका त्रासदायक अनुभव स्त्रीच्या आयुष्यात दुसरा नाही."

बहुपत्नीत्व, स्त्रीला वारसाहक्क नाकारणं, घटस्फोटाचा अधिकार न देणं – या सगळ्या गोष्टी स्त्रीच्या सन्मानाला बाधा देणाऱ्या होत्या. काही सदस्य म्हणत होते – "घटस्फोट ही पाश्चात्य रीत आहे. आपल्या संस्कृतीला घातक आहे."

मी त्यांना उत्तर दिलं – "घटस्फोट नवा नाही. आपल्या शास्त्रांतही त्याचा उल्लेख आहे. परिस्थिती असह्य झाली, तर स्त्रीला विभक्त होण्याचा कायदेशीर अधिकार असलाच पाहिजे."

मुलीला संपत्तीत हिस्सा देणं म्हणजे पाश्चात्य प्रभाव – असंही म्हटलं गेलं. मी लोकगीतांचे दाखले दिले. आपल्या परंपरेत मुलगी आणि मुलगा हे आईवडिलांसाठी सारखेच असतात. मग वारसाहक्कात भेद का?

त्या वेळी बिलाला तीव्र विरोध झाला. पण काळ बदलला. पुढे त्याच तत्वांवर कायदे मंजूर झाले. मला वाटतं – समाज आपोआप बदलत नाही. काहींना ठामपणे उभं राहावं लागतं.

१९५२ नंतर मी ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणासाठी काम केलं. त्यांना केवळ पुस्तकी शिक्षण नव्हे, तर शिवणकाम, विणकाम, उद्योगकौशल्यं शिकवण्याचा प्रयत्न केला. कारण आर्थिक स्वावलंबनाशिवाय स्त्रीचं स्वातंत्र्य अपूर्ण आहे.

मी लेखिका होते, सत्याग्रही होते, खासदार होते. पण सर्वात आधी – मी स्त्री होते. आणि मला ठाम विश्वास होता – स्त्रीला न्याय मिळाला तरच समाज पुढे जाईल. घरात समानता आली तरच राष्ट्र मजबूत होईल.

आज जर एखादी मुलगी वारसाहक्काने संपत्तीत हिस्सा घेते, घटस्फोटानंतर सन्मानाने उभी राहते, किंवा बहुपत्नीत्वाविरोधात आवाज उठवते – तर त्यामागे त्या काळात उभ्या राहिलेल्या आमच्या लढ्याची सावली आहे.